आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

११ जून २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- नव्या केंद्रीय मंत्रिमंडळातल्या बहुतांश मंत्र्यांनी स्वीकारला आपापल्या खात्यांचा कार्यभार
- ओदिशाच्या मुख्यमंत्रीपदी भाजपाचे मोहन चरण मांझी यांची निवड
- पुढच्या शैक्षणिक वर्षापासून उच्च शिक्षण संस्थांना वर्षातून दोनदा प्रवेश प्रक्रिया राबवायला विद्यापीठ अनुदान आयोगाची परवानगी
- नीट परीक्षाप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाची राष्ट्रीय चाचणी संस्थेला नोटीस, मात्र परीक्षेनंतरच्या काउन्सिलिंग प्रक्रीयेला स्थगिती द्यायला नकार

**आणि**

- मालावीचे उपाध्यक्ष साऊलोस चिलिमा यांचा विमान अपघातात मृत्यू

**<><><><><>**

केंद्रातल्या नव्या मंत्रिमंडळाचं खातेवाटप काल जाहीर झाल्यानंतर आज नवनियुक्त मंत्र्यांनी आपापल्या खात्यांचा कार्यभार स्वीकारला. राजनाथ सिंह यांनी संरक्षण, अमित शहा यांनी गृह, डॉ. एस. जयशंकर यांनी परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाची सूत्रं हाती घेतली. जे. पी. नड्डा यांनी आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री म्हणून, तर प्रतापराव जाधव यांनी या खात्याचे राज्यमंत्री म्हणून कार्यभार स्वीकारला. रामदास आठवले यांनी सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री म्हणून पदभार स्वीकारला. अश्विनी वैष्णव यांनी माहिती आणि प्रसारण मंत्री म्हणून, तर डॉ. एल. मुरुगन यांनी या खात्याचे राज्यमंत्री म्हणून सूत्रं हाती घेतली.

शिवराज सिंह चौहान यांनी कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाचा, तर गजेंद्र सिंह शेखावत यांनी सांस्कृतिक मंत्रालयाचा पदभार स्वीकारला.

ज्योतिरादित्य शिंदे यांनी दूरसंवाद मंत्री म्हणून पदभार स्वीकारला. रक्षा खडसे यांनीही क्रीडा राज्यमंत्री म्हणून कार्यभार स्विकारला. हरदीप सिंह पुरी यांनी पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री म्हणून, तर सुरेश गोपी यांनी या खात्याचे राज्यमंत्री म्हणून, पदाचा कार्यभार स्विकारला तसंच किरेन रिजिजू यांनी संसदीय कामकाज आणि अल्पसंख्याक मंत्री म्हणून, तर मनोहर लाल यांनी केंद्रीय ऊर्जामंत्री म्हणून कार्यभार स्विकारला.

**<><><><><>**

ओदिशाच्या मुख्यमंत्रीपदी भाजपाचे मोहन चरण मांझी यांची निवड झाली आहे. ओदिशातल्या भाजपा विधिमंडळ पक्षानं आज भुवनेश्वर इथं झालेल्या बैठकीत एकमतानं त्यांची नेता म्हणून निवड केली. केंद्रीय निरीक्षक या नात्याने केंद्रीय मंत्री राजनाथ सिंग यांनी मांझी यांची निवड जाहीर केली. राज्यात के.व्ही.सिंग देव आणि प्रवाती परिदा असे दोन उपमुख्यमंत्री असतील. नुकत्याच झालेल्या ओदिशा विधानसभेच्या निवडणुकीत भाजपानं ७८ जागा जिंकून बहुमत मिळवलं आहे.

**<><><><><>**

भाजपा संसदीय मंडळानं खासदार रवी शंकर प्रसाद आणि पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस तरुण चुघ यांची अरुणाचल प्रदेशच्या भाजपा विधिमंडळ पक्षाच्या नेतृत्वाची निवड करण्यासाठी  केंद्रीय निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. उद्या ते इटानगर इथं पोहोचतील आणि आढावा बैठकी नंतर नव्या मुख्यमंत्र्यांच्या नावाची घोषणा करतील. त्यानंतर राज्यपालांकडे सत्तास्थापनेचा दावा केला जाईल.नव्या मुख्यमंत्र्यांचा आणि मंत्रिमंडळाचा शपथविधी येत्या गुरुवारी होईल. नुकत्याच

झालेल्या अरुणाचल प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीत भाजपानं ६० पैकी ४६ जागा जिंकून दणदणीत विजय मिळवत आपली सत्ता राखली आहे.

**<><><><><>**

काँग्रेसच्या उत्तर प्रदेशामधल्या ‘आभार यात्रे’ला आज रायबरेलीतून सुरुवात झाली. काँग्रेस नेते राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांनी यावेळी आयोजित सभेला संबोधित केलं. लोकसभा निवडणुकीत लोकांनी हिंसा, असत्य आणि अहंकाराच्या विरोधात मतदान केलं आहे, असं राहुल गांधी यावेळी म्हणाले. भाजपा नेते राज्यघटना बदलायची म्हणत होते, पण लोकांनी त्यांना घटनेचं दर्शन घ्यायला भाग पाडलं, असंही राहुल म्हणाले. तर रायबरेली आणि अमेठी मतदारसंघातल्या विजयामुळे लोकांना स्वच्छ राजकारण हवं आहे हे स्पष्ट झालं, असं काँग्रेस सरचिटणीस प्रियांका गांधी म्हणाल्या.

**<><><><><>**

राज्यात येत्या २६ तारखेला होणाऱ्या विधान परिषद निवडणुकीसाठी मतदानाची वेळ निवडणूक आयोगानं वाढवून दिली आहे. मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक, आणि मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा चार जागांकरता ही निवडणूक होत आहे. त्यासाठी या मतदानाची वेळ वाढवण्याची मागणी काही संघटनांनी केली होती, ती निवडणूक आयोगानं मान्य केली आहे.

**<><><><><>**

विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं परस्पर उमेदवार जाहीर केले असून उद्धव ठाकरे यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही, असं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मुंबईत वार्ताहर परिषदेत सांगितलं. ही निवडणूक महाविकास आघाडी म्हणून लढण्याची काँग्रेसची इच्छा आहे; असं

झालं तर लोकसभेसारखं यश मिळू शकतं असंही पटोले म्हणाले. अर्ज मागं घ्यायला वेळ असून याबाबत लवकरच निर्णय होईल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

<><><><><>

पुढच्या शैक्षणिक वर्षापासून उच्च शिक्षण संस्थांना वर्षातून दोनदा विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची मुभा देण्याचा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगानं घेतला आहे. निकालांना उशीर, आरोग्य समस्या किंवा वैयक्तिक कारणांमुळे प्रवेश चुकलेल्या विद्यार्थ्यांना याचा फायदा होईल. यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी पूर्ण एक वर्ष प्रतीक्षा करावी लागणार नाही. सध्याच्या नियमानुसार एका वर्षात एका शैक्षणिक सत्रात प्रवेश मिळतो.

<><><><><>

वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या नीट परीक्षेत यंदा काही गैरप्रकार झाल्याचा आरोप करत, त्याच्या चौकशीची आणि पूर्ण परीक्षा प्रक्रीयाच रद्द करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली आहे. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्लाह यांच्या सुट्टीकालीन पीठानं त्यावर राष्ट्रीय चाचणी संस्थेला नोटीस बजावली असून पुढची सुनावणी येत्या ८ जुलैला ठेवली आहे. मात्र परीक्षेनंतरच्या काउन्सिलिंग प्रक्रीयेला स्थगिती द्यायला न्यायालयानं नकार दिला.

<><><><><>

मालावीचे उपाध्यक्ष साऊलोस चिलिमा यांचा विमान अपघातात मृत्यू झाला असल्याचं मालावीचे अध्यक्ष लाझरस चाक्वेरा यांनी आज दूरचित्रवाणीवरुन जाहीर

केलं. चिलिमा प्रवास करत असलेलं लष्करी विमान काल खराब हवामानामुळे मुझ्झू शहरात उतरु शकलं नव्हतं. राजधानी लिलोंग्वेकडे परतीच्या वाटेवर असताना ते बेपत्ता झालं होतं. विमान जंगलात अपघातग्रस्त झालं असून त्याचे अवशेष सापडले आहेत मात्र विमानातून प्रवास करणाऱ्या ९ जणांपैकी कोणीही वाचलं नाही असं अध्यक्ष चाक्वेरा यांनी सांगितलं.

**<><><><><>**

केंद्रीय कृषी मूल्य आणि दर आयोगाच्या माध्यमातून पिकांना चांगला किमान आधारभूत दर मिळून त्यांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली आहे. ते आज मुंबईत केंद्रीय कृषी मूल्य आयोगाच्या बैठकीत बोलत होते. शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य असून, शेतमालाला चांगला भाव आणि बाजारपेठ मिळावी यासाठी प्रधानमंत्र्यांसमोर आपलं म्हणणं नुकतचं मांडलं असल्याचं ते म्हणाले. सोयाबीन, कांदा, कापूस या शेतमालाला चांगली आधारभूत किंमत मिळावी, तसंच शेतकऱ्यांच्या इतर प्रश्नी देखील आपण लवकरच केंद्रीय कृषीमंत्र्यांना भेटणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

रब्बी पिकांसाठी किमान आधारभूत दर निश्चित करण्यासाठी पश्चिम भारतातल्या राज्यांच्या प्रतिनिधींची ही बैठक होती. आयोगाचे अध्यक्ष विजय पाल शर्मा बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते.

**<><><><><>**

डिसेंबर २०२५ मध्ये होणाऱ्या पुरुष कनिष्ठ गट विश्वचषक स्पर्धेचं यजमानपद भारताला देण्यात आलं आहे. आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशनच्या कार्यकारी मंडळानं आज स्वित्झर्लंड मध्ये झालेल्या बैठकीत हा निर्णय घेतला.

**<><><><><>**

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज न्युयॉर्कमधे नासॉ कौंटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट मैदानावर पाकिस्तान आणि कॅनडा यांच्यात सामना सुरु आहे. पाकिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं जून महिन्यासाठी, संकलित करांपैकी एक लाख ३९ हजार कोटी रुपयांची रक्कम राज्यांना वितरित केली आहे. या रकमेमुळं राज्य सरकारांना विकासकामांना गती देण्यासाठी आणि भांडवली खर्चांसाठी उपयोग होईल, असं अर्थ मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मीरमध्ये वैष्णवदेवीला जाणाऱ्या यात्रेकरूंच्या बसवर दहशतवादी हल्ला करणाऱ्यांना पकडण्यासाठी युद्धपातळीवर शोधकार्य सुरू आहे. सुरक्षा यंत्रणेची ११ पथकं रियासी जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात शोध घेत असून संपूर्ण परिसरात कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे.

**//<><><><><>//**